लोकमत

# विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळा



विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करताना सायबर वॉरियर्स.

लोकमत न्यूज नेटवर्क

**महान** : येथील प्रोफेसर जावेद खान उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील प्राचार्य डॉ. जे. एम. साबू व समन्वयक डॉ. दीप्ती पेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच मोबाइल व इंटरनेटचा जबाबदारीने वापर करण्याची शपथ देण्यात आली. या प्रसंगी मुख्याध्यापक मोहम्मद रफिक अब्दुल रऊफ यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार डिजिटल सवयी विकसित होतात, असे मत व्यक्त केले.

सायबर फसवणूक, ऑनलाइन लुबाडणूक यासारख्या धोक्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, फसवे संदेश ओळखण्याचे तंत्र आणि मोबाइल सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स विद्यार्थिनी अदिती जनोरकर व तनुजा घोगरे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगितले.

**सायबर वॉरियर्स विद्यार्थिनींनी उपस्थितांना ऑनलाइन सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगितले.**

शिक्षक शेख काशीद, फैजनुल्लाह खान, गुफ्रान उल्लाह खान, वासिमोद्दीन जागिरदार, मोहम्मद शहेजाद, शिक्षिका सालेहा फिरदौस आसिफोद्दीन, झकिया परवीन, अन्सार अहमद आदी मान्यवर उपस्थित होते. मोहम्मद शाहिद अब्दुल हमीद यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.